# पथेर पांचाली

विभुतीभूषण बॅनर्जी

अनुवाद

**प्रसाद ठाकूर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**पथेर पांचाली : प्रसाद ठाकूर**

© **प्रसाद ठाकूर**
'प्रसाद व्हिला', इंद्रप्रस्थनगर,
साने गुरुजी वसाहतीजवळ,
कोल्हापूर- ४१६ ०१२
मो. ९९६०४९११२१

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
सप्टेंबर, २०१२

**किंमत**
रुपये ३८०/-

# पथेर पांचाली

# मनोगत

'पथेर पांचाली' बंगाली भाषेतील एक अभिजात कादंबरी. विभुतीभूषण बॅनर्जी यांची ही पहिलीच कलाकृती. स्वतः लेखकाचं दारिद्र्यग्रस्त आणि कष्टमय बालपण या कादंबरीत आविष्कृत झालं आहे. या कादंबरीच्या कथाभागावर तयार केलेला सत्यजित रे यांचा 'पथेर पांचाली' हा चित्रपटही तेवढाच महत्त्वपूर्ण ठरला. ऑस्कर पुरस्कारामुळे त्याची गुणवत्ता आणखीच अधोरेखित झाली.

आजही 'पथेर पांचाली' म्हटलं की साहित्य आणि चित्ररसिकांच्या भिवया उंचावतात. लेखक-दिग्दर्शकाच्या कौशल्यापुढे ते नतमस्तक होतात. म्हणूनच हा चित्रपट ज्या कादंबरीवरून घेतला ती मूळ कादंबरी मराठी वाचकांसमोर सादर करण्याचा हा एक नम्र प्रयत्न आहे.

जवळपास एका शतकापूर्वीच्या बंगाली ग्रामीण जीवनाचं इतकं अनोखं चित्रण या कादंबरीत उतरलं आहे की वाचक एका वेगळ्या विश्वात जणू हरवून जातो. हरिहर, त्याची पत्नी सर्वजया, मुलं अपू-दुर्गा आणि त्याची वृद्ध आत्या इंदिरा या कुटुंबाची ही कथा आहे. दारिद्र्याला तोंड देताना जीवनसंघर्ष अधिकच तीव्र होत जातो. कुटुंबासाठी गावोगाव भटकंती करणारा हरिहर बनारसला स्थलांतरित होण्याचा निर्णय घेतो. पाहता पाहता वाचकही जणू त्या कुटुंबाचाच एक घटक होऊन जातो. अपू आणि दुर्गा त्याचे सवंगडी होऊन जातात. सर्वांत चटका लावून जातो तो दुर्गाचा अंत. त्यामुळे अपूच्या दृष्टीने निश्चंडीपूर सोडणं म्हणजे आपल्या आवडत्या दीदीला निरोप देणं ठरतं. एका उमलत्या वयातल्या मुलाचा होत जाणारा हा मानसिक विकास आणि त्याचे मोहून टाकणारे चित्रण ही या कादंबरीची मोठीच सशक्त बाजू आहे.

साहित्यरसिकांनी अनुभवलीच पाहिजे अशी अभिजात कलाकृती म्हणजे 'पथेर पांचाली !' जणू तिच्यासारखी तीच !!

१

# इंदिरा ठाकुरन

१

## इंदिराआत्या

निश्चंडीपूर गावाच्या अगदी उत्तर टोकाला दगड-विटांनी बांधलेल्या एका जुन्या घरात हरिहर रे हा ब्राह्मण गृहस्थ रहात असे. साधारणपणे बंगालमधील खेड्यांमध्ये असतात तसंच ते एक साधं आणि छोटंसं घर होतं. घराच्या आवाराभोवती बांधलेल्या भिंतीला एक लहानसं दार होतं. तिथून आत आलं म्हणजे अंगणात, आणि अंगणातून घरात प्रवेश करता येत असे. एका बाजूला पुन्हा तसंच आणखी एक अंगण होतं आणि त्याच्या मागे स्वयंपाकखोली होती.

हरिहरला फार सधन गृहस्थ म्हणता आलं नसतं. थोड्याफार वडिलोपार्जित शेतीवर त्याची आपल्या कुटुंबासह गुजराण चालू होती. शिवाय तो पौरोहित्यही करीत असे, आणि त्यातून त्याला थोडंफार उत्पन्न मिळत असे.

आवाराच्या एका कोपऱ्यात आणखी एक झोपडीवजा खोली होती. हरिहरच्या दूरच्या नात्यातली एक विधवा त्या खोलीत राहात असे. ती म्हणजेच इंदिरा ठाकुरन. इंदिरा आणि हरिहरचं नेमकं नातं सांगणं तसं कठीणच होतं. पण इंदिरा हरिहरला 'भाचा' म्हणायची. हरिहरही तिला आत्या मानायचा. त्यामुळं हरिहरची पत्नी सर्वजया तिला 'ठाकुरजी' म्हणायची आणि अर्थातच इंदिरा आत्या सर्वजयाला 'बहू' म्हणून हाक मारायची. त्यामुळं हरिहरची लहानगी कन्या दुर्गा ही सुद्धा इंदिरा ठाकुरनला 'आत्या' म्हणायची. एकंदरीत इंदिरा ही हरिहरच्या कुटुंबात 'इंदिरा आत्या' म्हणून सामावून गेली होती.

सकाळची वेळ होती. नुकतेच अंगणात आलेले सूर्यकिरण हळूहळू पुढे सरकत जाऊन ओट्यावर आणि इंदिराआत्याच्या अंगावर पसरले. इंदिराआत्या एक पितळी वाडगा पुढ्यात घेऊन त्यातला भात आधाशासारखी भरभर खात होती. खरं म्हणजे ती एकादशीचा उपवास सोडत होती. त्यामुळंच ती एवढ्या सकाळी जेवायला बसली होती. आपल्या बोळकं झालेल्या तोंडानं ती अगदी मन लावून आणि मिटक्या मारत, अगदी एकाग्रपणे वाडग्यातला भात संपवत होती. तिचं सगळं लक्ष त्या वाडग्यावरच केंद्रित झालेलं होतं. इतकं की सगळा भात खाऊन होईपर्यंत तिनं एकदाही मान वर करून पाहिलं नाही.

हरिहरची सहा वर्षे वयाची मुलगी दुर्गा इंदिराच्या समोरच बसली होती. दुर्गा मूकपणे बसली होती. पण तिचे आशाळभूत डोळे एकदा भाताच्या वाडग्याकडे, तर एकदा इंदिराच्या तोंडाकडे असे सारखे खालीवर होत होते. जसजसा वाडग्यातला भात कमी कमी होत चालला, तसतशी दुर्गा निराश होत गेली. एक-दोनदा तिला वाटलं सुद्धा की आत्याला भात मागावा. त्यासाठी तिनं तोंड उघडलंही होतं. पण का कुणास ठाऊक, ती आवंढा गिळून तशीच बसून राहिली.

इंदिराआत्यानं चाटूनपुसून सगळा भात संपवला. बोटं चाटत आणि समाधानाचा ढेकर देत तिनं वर पाहिलं, तर तिची नजर समोरच बसलेल्या दुर्गावर पडली. दुर्गाच्या डोळ्यातली ती भूक पाहून इंदिरा म्हणाली, ''अगं बाई ! पोरी, तू इथंच बसलीयस होय ? तुझ्यासाठी थोडा भात ठेवावा हे मेलं ध्यानातच आलं नाही माझ्या. किती गं मी आप्पलपोटी !''

दुर्गाच्या डोळ्यातली निराशा लपून राहिली नव्हती. सुस्कारा टाकून ती म्हणाली, ''असू दे गं आत्या.''

इंदिराजवळ दोन पिकलेली केळी होती. त्यातलं एक घेऊन तिनं ते तोडलं आणि त्याचा अर्धा भाग दुर्गाला दिला. भुकेल्या दुर्गाचे डोळे आनंदानं चमकले. तिनं चटकन ते घेतलं आणि ती आधाशासारखी खाऊ लागली. पण ते भाग्य तिला फार वेळ लाभलं नाही. कारण तेवढ्यात घरातून तिच्या आईची हाक कानावर आली.

''तू पुन्हा तिथं कशाला चिकटलीस ? चल ये इकडे.''

इंदिराआत्या म्हणाली, ''अगं बसू दे गं सूनबाई, ती काही त्रास देत नाही. नुसती बसलीय माझ्याजवळ. बसू दे की !''

''मूर्ख कुठली !'' सर्वजया ओरडली. ''कोणी काही खात असलं की ही तिथं पोहोचलीच म्हणून समजा ! तुम्ही खाता आणि ती तुमच्या तोंडाकडे बघत बसते. मला नाही आवडत ते. ऊठ गं कारटे, इकडे ये बघू चटकन.''

नाराजीनंच दुर्गा उठली आणि भीतभीत घरात गेली.

सकाळचं ऊन अंगावर घेत इंदिरा जुन्या आठवणींमध्ये बुडून गेली.... आज पुन्हा एकदा काही हव्या असलेल्या आणि काही नको असलेल्या आठवणींनी तिच्या मनात गर्दी केली....

अगदी लहान वयात झालेलं ते लग्न.... त्यावेळी आपण किती छान दिसत होतो हे सगळं तिला आठवलं. कधी काळी पूर्व बंगालमधील एका कुलीन ब्राह्मणाशी तिचं लग्न झालं होतं. स्वतःला कुलीन समजणारे हे ब्राह्मण अनेक बायका करण्याबाबत कुप्रसिद्ध असत. इंदिराचा नवराही तसलाच होता. तो इंदिराला क्वचितच भेटायला यायचा. कारण त्याचं घर खूप दूर असलेल्या कुठल्या तरी एका खेड्यात होतं. त्यानं कधीही इंदिराला आपल्या घरी म्हणून नेलं नाही. परिणामी कधी काळी आपलं लग्न झालं होतं हेही इंदिरा विसरून गेली होती. एकदाच त्यानं आपल्या दोन वर्षांच्या कन्येसाठी थोडी मिठाई आणली होती, तेवढीच एक आठवण्यासारखी गोष्ट. लोक सांगत की तो मोठा विद्वान ब्राह्मण आहे. कालांतराने इंदिराचे आईवडील वारले, तेव्हा ती भावाच्या आश्रयानं राहू लागली. पण दुर्दैवानं तिचा तो भाऊही तरुण वयातच मरण पावला. त्यामुळं ती नाइलाजानं तिच्या रामचंद्र नावाच्या काकांच्या आश्रयानं जगू लागली.

एक दिवस इंदिराला एक पत्र मिळालं. पण तिला वाचता येत नसल्यामुळं ते पत्र घेऊन ती काकांकडे गेली. तिथं गेली तर काकांच्या खोलीत बरीच माणसं हास्यविनोद करत आणि बुद्धिबळ खेळत बसली होती. तर काही माणसं हुक्का ओढत लोडाला टेकून आरामात बसली होती.

''काय गं इंदिरा ?'' काकांनी विचारलं.

इंदिरा लाजली. ते पत्र काकांच्या हातात ठेवत ती म्हणाली, ''पत्र आलंय.''

पत्र वाचून काका एकदम खेकसलेच, ''कुणी आणून दिलं हे ?''

''ह्यांच्या गावाचा एक माणूस देऊन गेला.'' 'माझ्या नवऱ्याकडून' असं ती म्हणू शकली नाही. कारण तसं म्हणणं पद्धतीला धरून झालं नसतं.

सुस्कारा सोडून काका म्हणाले, ''चल ये माझ्याबरोबर.'' आणि ते इंदिराला घरात बायकांजवळ घेऊन गेले.....

.....आता त्या सगळ्या आठवणी इंदिराला नकोशा वाटतात. तेव्हा ती इतकी रडली होती की आता तिच्या डोळ्यातून टिपूसही येत नाही.

त्या स्त्रियांनी तिच्या हातातल्या बांगड्या फोडून टाकल्या. तिच्या कपाळावरचं सौभाग्यचिन्ह पुसून टाकलं. तिच्या पायातल्या तिला फार आवडणाऱ्या चांदीच्या साखळ्यासुद्धा त्यांनी काढून घेतल्या. त्यानंतर गावाजवळच्या तळ्यात तिला आंघोळ करायला सांगण्यात आलं, आणि तेव्हापासून तिच्या अंगावर विधवेची वस्त्रं आली ती कायमचीच.

पण आज त्या आठवणी आल्या म्हणून ती रडणार आहे थोडीच ? अशा खूप आठवणी दररोज तिच्या मनात गर्दी करत असतात. आईवडील गेले, भाऊ गेला, त्यानंतर लग्न होऊन सासरी गेलेली तिची मुलगी अगदी अल्पवयात मरण पावली. ते सगळे दुःखद प्रसंग आठवून इंदिराला आता फार एकाकी वाटतं.

हरिहरचे वडील रामचंद्रकाका तिला या घरात घेऊन आले, त्यावेळी हरिहर अगदी लहानगा गोड मुलगा होता.

मग हरिहरचं लग्नही तिला आठवलं. नवरी होऊन घरात आलेली सर्वजयासुद्धा किती छान आणि सुंदर होती. सगळं घर रोषणाईनं झगमगत होतं. घरात सगळीकडे नुसता आनंदीआनंद भरलेला होता, पण तेव्हा छान दिसणारी ती नवी नवरी पुढे भलतीच भांडखोर निघाली.

त्यानंतर कित्येक वर्षं उलटली. कित्येक फुलं फुलली आणि कोमेजली. 'जॉन्सन अँड जॉन्सन' हा नीळ बनवणारा कारखानाही इच्छामतीच्या पाण्यात गवताच्या काडीसारखा वाहून गेला. इंदिरा मात्र अजूनही जिवंत आहे. आता ती काही पूर्वीसारखी हसरी आणि सडपातळ राहिलेली नाही, तर पंचाहत्तर वर्षांची वृद्धा झाली आहे. गालफडं पार बसली आहेत आणि शरीर कमरेतून वाकलं आहे. डोळ्यांनाही दूरचं काही दिसत नाही.

आज इंदिरा डोळे मिटून भूतकाळात पाहते, तेव्हा तिला आणखीही बरीचशी दृश्यं जशीच्या तशी नजरेसमोर दिसतात. दर पंधरवड्याच्या उपवासानंतर ती जेवायला बसायची, तेव्हा रामचंद्रची बायको स्वतःच्या हातानं तिला भरवायची. त्यानंतर तीही विधवा झाली आणि हरिहर या तिच्या एकुलत्या मुलाला मागे ठेवून